## श्रीदासराममहाराजांची प्रार्थना

आहे आता विनवणी । तुझा विसर मनी न आणी ।।१।।

अहंकार घालवावा । वासनेचा ताप न व्हावा ।।२।।

विकल्प ते मोडोनि जावे । भक्तिप्रेम वाढो द्यावे ।।३।।

माझा साधनी आचार । करवूनि घ्यावा सत्वर ।।४।।

ब्रह्मरूपी मजलागी । मिळवावे तुम्ही योगी ।।५।।

*केशव* प्रार्थितसे तुम्हा । नका विसरू रामा आम्हा ।।६।।

## श्रीदासराममहाराजांचे पायीं दंडवत

राम राय राम राय राम राय राम राय ।
राम माय राम माय राम माय राम माय ।
राम तात राम तात राम तात राम तात ।
राम पायी दंडवत राम पायी दंडवत ।।

## ।। मला ठाव द्यावा पायी ।।

माझे पितृदेव ती.प.पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे ११८ ओव्यांमध्ये 'नित्य–पाठ–चरित्र' त्यांचेच अंतरंगातील प्रा.डॉ.के.वा. आपटे यांनी लिहिले आहे. हे चरित्र त्यांनी प्रथमपासून पाहिलेले असल्यामुळे त्यांनी लिहिलेले हे 'नित्य–पाठ–चरित्र' वाचताना एक वेगळाच आनंद आपल्याला प्राप्त होणार आहे.

थोर महात्मे होऊनी गेले । चरित्र त्यांचे पहा जरा ।।
आपण त्यांच्या समान व्हावे । हाचि सापडे बोध खरा ।।

चरित्रातून प्राप्त होणारा हा खरा बोध आहे. तथापि ती.प. पू. श्रीदादांनी त्यांच्या पायांशी मला जागा द्यावी, एवढीच प्रार्थना त्यांचे चरणीं करतो.

भगवान श्रीसद्गुरू श्रीनिंबरगीचे महाराज, भगवान श्रीसद्गुरू श्रीतात्यासाहेबमहाराज कोटणीस, माझे आजोबा ती. प. पू. श्रीमामामहाराज केळकर व माझे पितृदेव ती. प. पू. श्रीदासराममहाराज केळकर यांचे चरणीं शतश: अभिवादन करून येथेच थांबतो.

।। सद्गुरुनाथ माझे आई । मला ठाव द्यावा पायी ।।
शेष श्रीरामस्मरण !

**सांगली.**
२२/१/२००७
श्रीगणेश जयंती

श्री दादांचा कृपाभिलाषी,
*चंद्रशेखर*
**(चंद्रशेखर रामराय केळकर)**

## लेखकाचे मनोगत –

भारत देशात काही भाग्यवंत राजयोगी संत होऊन गेले. त्यांमध्ये सांगलीतील श्रीदासराममहाराज केळकर (रामराय गोविंद केळकर) यांची गणना होते. श्रीदासराममहाराजांचे आणखी सुदैव असे की त्यांचे लहानपणापासूनच त्यांचा गौरव इतर लोक करीत होते. आणि हा गौरव पद्यात तसेच गद्यात झालेला होता. इ. स. १९२९ पासून ते श्रीदासराममहाराजांच्या निर्याणापर्यंत आणि निर्याणानंतरही त्यांचा मोठेपणा आणि महत्त्व सांगितले गेले. ज्या ज्या काळात हे लेखन झाले त्यापर्यंतच्या काळातील दासराममहाराजांच्या जीवनातील महत्त्वाच्या घटना त्या लेखनात आलेल्या दिसतात. उदाहरणे देऊन सांगायचे झाल्यास : (अ) पद्यबंध :– (१) सिद्रामप्पा मैंदर्गीकृत ओव्या (इ. स.१९२९ चा सुमार) (२) शिवाप्पा रामाप्पा सोनार यांच्या ओव्या (इ. स.१९२९ चा सुमार) (३) नामदेव मोरेश्वर कुलकर्णी रचित ओव्या (इ.स.१९४१ चा सुमार) (४) वसंत महेश्वर बापट यांनी केलेले अभंग (इ.स.१९५२ चा सुमार) (५) के. वा. आपटे प्रणीत श्रीदासरामगीतम् (संस्कृत भाषेत इ.स.१९९१) (६) के. वा. आपटे प्रणीत एक पद (इ.स.१९९८) (७) प्रकाश भावे रचित 'चैतन्यरूपाय नमो नमस्ते' (८) के. वा. आपटे कृत विहंगम जीवनदर्शन (इ.स. २०००) (९) पंडित हेर्लेकर रचित 'श्रीदासरामपंचपदी' (संस्कृत भाषेत) (दासरामांचे निर्वाणानंतर), आणि (१०) प्रसन्न पां. गोखले कृत 'स्मरणिका' (दासरामांचे निर्वाणानंतर). (आ) गद्यातील लेखन असे :–





## नमस्कार श्रीदासरामासी माझा

जयाचा जगी जन्म त्या सत्कुळात । जयाचे पिता मात दोन्ही महंत ।
गुरू तोषवीला हनूमंत राजा । नमस्कार श्रीदासरामासी माझा ।।१।।

जया वोळला श्रीगुरुलिंगराया । मिळाली गीता कानडी रामराया ।
असा थोर हा संत प्रल्हाद राजा । नमस्कार श्रीदासरामासी माझा ।।२।।

जयाची मती कीर्तनी गुंग झाली । जयाची कृती साधनी दंग झाली ।
जयाची रती हो सदा देवकाजा । नमस्कार श्रीदासरामासी माझा ।।३।।

## श्रीदासराममहाराजांचा जयजयकार

जय जय श्रीराम रामा । जय जय दासराम रामा ।।१।।

जय जय गुरुलिंग रामा । जय जय हनुमंत रामा ।।२।।

जय जय इंदिरा रामा । जय जय गोविंद रामा ।।३।।

जय जय सीता राम रामा । जय जय *केशवा* रामा ।।४।।

## श्रीदासराममहाराजांची आरती

आरती रामराया । करी कृपेची छाया ।
दावोनी दीनी दया । धन्य धन्य महाराया ।।ध्रु।।

सद्गुरू हनुमंत । पिता गोविंद संत ।
बोधी गुरुलिंग सिद्ध । धरुनि रूप सिद्धानंद ।।१।।

सिद्धसाधनाने । स्वये ब्रह्मचि झाले ।
भावादरे *केशवाने* । चरणी मस्तक ठेविले ।।२।।

## श्रीदासराम-नवार्णव मंत्र

।।ॐ श्रीदासरामाय नमः ।।

## श्रीदासराममहाराजांचा गायत्री मंत्र

दासरामाय विद्महे । गोविंदसुताय धीमहि ।
तन्नो रामः प्रचोदयात् ।

(१) 'गुरुलिंगप्रसादगीता' ग्रंथातील, वासुदेवराव जोशी कृत 'प्रकाशकाचे चार शब्द' आणि के. वा. आपटे यांचे प्रास्ताविक (इ.स.१९५३) (२) श्रीदासरामगौरवग्रंथातील (इ.स.१९८०) के. वा. आपटे यांनी लिहिलेला दीर्घ चरित्रबंध, तसेच प्रा. दा. वि. कुलकर्णी, प्रा. म. अ. कुलकर्णी, श्री. मधुकर शिपुरकर, आणि प्रा. डॉ. गं. वि. कुलकर्णी यांचे लेख (३) साप्ताहिक तुतारीच्या रामराय केळकरमहाराज विशेषांकातील (इ.स.१९८७) काही लेख (४) श्रीदासराममहाराजांचे निर्याणानंतर नाना नियतकालिकांत आलेले लेख आणि (५) श्रीदासराममहाराज चरितामृत (इ.स. २००२).

वरील लिखाणांपैकी 'श्रीदासराममहाराज चरितामृत' हा विस्तृत चरित्रग्रंथ सोडला, तर इतर लेखन हे कमीजास्त अपूर्ण, फुटकळ आणि विखुरलेल्या स्वरूपात आढळते. दासराममहाराजांच्या काही भक्तांना दासराममहाराजांचे संपूर्ण चरित्र संक्षिप्त स्वरूपात नित्य पठणास हवे असे वाटत होते. ही अपेक्षा पूर्ण करण्यास एक लघुग्रंथ लिहावा असे मला वाटत होते. पण वेळ आल्याशिवाय काही गोष्टी घडत नाहीत. तसेच झाले. आणि चालू वर्षी श्रीदासराममहाराजांचे 'नित्य पाठहृचरित्र ' हे मजकडून लिहून झाले. या लेखनासाठी मी मुख्य आधार घेतला तो मीच पूर्वी लिहिलेल्या 'विहंगम जीवन दर्शन'मधील ओव्यांचा. यातील ११८ ओव्यांपैकी बऱ्याचशा ओव्या येथे जशाच्या तशा घेतल्या आहेत, काही ओव्यांत योग्य ते फेरफार केले आहेत, तर काही ओव्या गाळल्या आहेत. या ओवीबद्ध प्रकरणातील श्रीदासरामांच्या कीर्तनांचे सार सांगणाऱ्या ओव्या बाजूला घेऊन, त्या कीर्तनहृसारहृअष्टक या स्वरूपात चरित्रानंतर दिल्या

आहेत. विहंगम–जीवन–दर्शनात दासरामांच्या जीवनातील सहस्त्रचंद्रदर्शन पर्यंतचा भाग होता. त्यानंतर झालेले त्यांचे महानिर्वाण आणि निर्वाणानंतरच्या काही महत्त्वाच्या घटना संक्षिप्तपणे सांगणाऱ्या ओव्या रचल्या पण ओवी संख्या मात्र ११८ इतकीच ठेवली. त्या ओव्या वाचण्यास, वाचण्याच्या कमीजास्त वेगानुसार ७ ते१३ मिनिटे इतका कालावधि लागतो. त्यामुळे सध्याच्या घाईगर्दीतसुद्धा तेवढा वेळ देऊन हे ओवीपठण होऊ शकते. ७ ते १३ मिनिटांपेक्षा अधिक वेळ जे भक्त देऊ शकतील, त्यांच्यासाठी मुख्य चरित्रानंतर कीर्तनह्रसारह्रअष्टक, दासरामांची आरती, दासराम गायत्री, 'नमस्कार श्रीदासरामासी माझा' ही श्लोकत्रयी, दासरामांचा जयजयकार करणारा अभंग, दासरामांना प्रार्थना करणारा अभंग आणि दासरामांना दंडवत घालणारा श्लोक दिला आहे. त्यानंतर दासराममहाराजांच्या १०८ नामांचे स्तोत्र व संस्कृत आरती दिली आहे.

हा संपूर्ण लघुग्रंथ मी श्रीदासरामांचे चिरंजीव ह.भ.प. चंद्रशेखर आणि अनिलप्रभु तसेच चंद्रशेखरांचे सुपुत्र दीपक यांना वाचण्यास दिला. त्यांना तो पसंत पडला आणि श्रीदासराम ग्रंथमालेचे पाचवे पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्याचे त्यांनी मान्य केले. तसेच या ग्रंथाला पुरस्कारही चंद्रशेखर अण्णामहाराजांनी दिला आहे. या तिघांनाही मन:पूर्वक धन्यवाद. माझी पत्नी सौ. माया, पुत्र नारायण व स्नुषा सौ. पद्मावती यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनाही धन्यवाद. ज्या श्रीदासराममहाराजांच्या प्रेरणेनुसार हा लघुग्रंथ सिद्ध झाला, त्यांचे चरणीं शतश: प्रणाम.

के. वा. आपटे





## श्रीदासराममहाराजांचे कीर्तन-सार-अष्टक

चिद्वायु सच्चिदानंद । आहे तो प्रकाशस्पंद ।
एक तोच नित्य सत्य शुद्ध । बाकी सर्व जड असे ।।१।।

चैतन्यातून जडाची उत्पत्ती । परी चैतन्याची सत्य महती ।
चैतन्य साक्षात्काराची स्थिती । साधणे आवश्यक ।।२।।

शुद्ध चैतन्याची प्राप्ती । जीव चैतन्या होई चैतन्याने निश्चिती ।
सद्गुरू त्यालागी करिती । आवश्यक कृपा ।।३।।

गुरुकृपेवीण सर्वथाही । चैतन्याचा अनुभव नाही ।
साधनयोगे गुरुकृपा ही । होतसे प्राप्त ।।४।।

गुरू सांगती साधन नाम । चैतन्यनादयुक्त नाम ।
श्वासोच्छ्वासी असे मध्यम । ते नाम असे सहज ।।५।।

सहज चैतन्य नामनादात । होता एकवट चित्त ।
केवल ब्रह्मचैतन्य रहात । नादप्रकाशरूपे ।।६।।

शरीरी वहातो पवन । प्राणापानामाजी मनाचे मीलन ।
होतसे परमार्थ पूर्ण । तया ठाया ।।७।।

सहज साधनाचे अभ्यासात । नीलवर्ण प्रकाश दिसत ।
तोची परमात्मा सत्य । साक्षात्कारा येतसे ।।८।।

## द्वितीय आवृत्तीची प्रस्तावना

'श्रीदासराममहाराजांचे नित्यपाठचरित्र' या पुस्तकाची पहिली आवृत्ति इ.स. २००७ मध्ये प्रकाशित झाली होती. ती लौकरच संपली. म्हणून श्रीदासराममहाराजांच्या भक्तांच्या सोयीसाठी या ग्रंथाची दुसरी आवृत्ति चालू इ.स. २००८ मध्ये प्रकाशित करण्यात येत आहे. या आवृत्तीत श्रीदासराममहाराजांच्या निर्याणाचा अभंग अधिक आलेला आहे.

या द्वितीय आवृत्तीचे कार्यात साहाय्य करणाऱ्या सौ. माया, चि. नारायण व सौ. पद्मावती यांना धन्यवाद !

बुधवार दि. २९/१०/२००८ — के. वा. आपटे
कार्तिक शुक्ल १ (दिवाळी पाडवा) शके १९३० — सांगली.

## तृतीय आवृत्तीची प्रस्तावना

'श्रीदासराममहाराजांचे नित्य-पाठ-चरित्र' या पुस्तकाची पहिली आवृत्ति इ.स.२००७ मध्ये आणि दुसरी आवृत्ति इ.स.२००८ मध्ये निघाली होती. या दोन्हीही आवृत्ति संपल्यामुळे आता ही तिसरी आवृत्ति इ.स. २०११ मध्ये निघत आहे. या आवृत्तीत 'श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रम्', 'श्रीदासराम-महाराजस्य नमनाष्टकम्' व 'श्रीदासराम-नवार्णव मंत्र' हा भाग नवीन घातला आहे. तोही दासराममहाराजांचे भक्तांना आवडेल.

या तृतीय आवृत्तीचे कार्यात साहाय्य करणाऱ्या सौ.माया, चि.नारायण व सौ. पद्मावती यांना धन्यवाद.

गुरुवार दि. २४/०३/२०११ — के. वा. आपटे
फाल्गुन वद्य ६ (श्रीएकनाथ षष्ठी) शके १९३२ — सांगली.





## श्रीदासराममहाराजांच्या १०८ नामांचे स्तोत्र

गौरांगं मनसा ध्यात्वा दासरामं सतां वरम् ।
नाम-स्तोत्रं पठेद् भक्त इच्छन् रामकृपांजनम् ।।१।।
दासरामो दया-सारो दासो देवस्य दर्शकः।
गुणग्राही गभीरात्मा गुण-युक्तो गुणेश्वरः ।।२।।
सांगली-नगरी-वासः सदाचारः सदा शुभः।
सत्त्ववान् सर्व-सारज्ञः सिद्धः साधन-संपदा ।।३।।
केळ्कर-कुल-संभूतो भव-बंधन-भंजनः ।
भक्तिमान् विष्णु-भक्तो हि भक्तस्याभीष्ट-दायकः।।४।।
अंताजी-राव-पौत्रश्च अंतःस्थारि-विमर्दनः।
अज्ञान-तमसश्छेत्ता अपराध-क्षमाकरः ।।५।।
गोविंदस्यात्मजो गौरो गुरु-गौरव-तत्परः।
गुणाकरो गुणाधारो गोविंद-गुण-वर्धनः ।।६।।
इंदिरा-गर्भ-संभूत इंदीवर-विलोचनः ।
इंद्रियेश्वर ईड्यश्च ईश-नामप्रसारकः ।।७।।
सीतापतिश्च श्रीरामः सर्व-पाप-प्रणाशनः।
सुखदश्च स्मिताभाषी संप्रदायस्य संश्रयः ।।८।।
चंडीश-पाद-षट्पादश्चंद्रशेखर-सेवितः ।
चैतन्य-चिंतने मग्नश्चारु-चंद्रानन-प्रभः ।।९।।
जनकः सूर्यकांतस्य जितमायो जितेंद्रियः।
जगद्-रूप-परिज्ञाता जगदुद्धार-कारकः ।।१०।।

जन्मत: सर्वज्ञ काही संत भले । ज्ञानेश्वर सांगून गेले ।
दासराम त्यांमाजी एकले । ऐसे साधु दुर्लभ ॥११०॥

दासरामांचे निखिल जीवन । जैसे संथ कृष्णा नदीचे जीवन ।
भक्तां करीतसे पूतपावन । संदेह सर्वथा नाही ॥१११॥

इतरांचे गुण राम जाणती । वाढवोनी तयां दाखविती ।
इतरांच्या स्तुतीला नसे मागुती । स्वभाव त्यांचा तसा ॥११२॥

संतमहंत येती घरा । रामांना वाटे दिवाळी दसरा ।
दासरामांचा परम जिव्हाळा । कळतसे सकळां ॥११३॥

करोनी नित्य हरिकीर्तन । तृप्त केले जिज्ञासु जन ।
परमार्थाचे प्रसारण । दासरामांनी केले ॥११४॥

दासरामांचे जीवन । असे परमार्थ पूर्ण ।
लोक होती पावन । दर्शन वंदने ॥११५॥

होते राम परम पावन । त्यांचे जीवन अति पावन ।
चरित्र पठणे वाचकां पावन । करील ते निश्चिती ॥११६॥

देह प्रपंची वर्तत । चैतन्यामाजी वसे चित्त ।
ऐसे असती सिद्धसंत । खूण पटे ही दासरामी ॥११७॥

श्रीदासराम सद्‌गुरु । संसार सागरी जैसे तारु ।
होवो साधका सुखकारू । *केशव* म्हणे ॥११८॥

**--------- नित्य-पाठ-चरित्र समाप्त -------**

श्रीदासराममहाराजांचे

# नित्य-पाठ-चरित्र

दयापूर्ण दासरामांचे चरणां । करोनी विनीतभावे वंदना ।
करीतसे प्रारंभ चरित्र-लेखना । पार पाडी गा दयाळा ॥१॥

कृष्णा-नदी-तीरी सहा गल्ली । म्हणताती जुनी सांगली ।
राहे तेथे केळकर-कुळी । पूत शुद्ध सदाचारी ॥२॥

पुत्र गंगाधराचा शोभत । नाव त्याचे असे अनंत ।
शुद्धाचारी नि शिवभक्त । जपे मंत्र षडक्षरी ॥३॥

अनंताचा सुत गोविंद । शिष्य नारायणाचा वरद ।
नारायण राही साधुराज-संनिध । चिमड क्षेत्री ॥४॥

कोटणीस महाराजांचे आज्ञेचे पालना । करती गोविंद नित्यकीर्तना ।
अडतीस वर्षे पूर्ण जाणा । नेम चालतसे त्यांचा ॥५॥

इंदिरा गोविंदांची पत्नी । प्रसवली तनय वरदानी ।
वजीरबाबा वचनेकरूनी । कुरुंदवाड ग्रामी ॥६॥

कोटणीसमहाराज सांगलीचे । तदा कुरुंदवाडी गेले होते साचे ।
बोलाविले गेले घरी इंदिरेचे । मुख बाळाचे पहावया ॥७॥

घेवोनी मांडीवरी बालकाला । कोटणीसे कुरवाळिले मुखाला ।
केला स्पर्श मस्तकाला । आपुल्या वरदहस्ते ॥८॥

डोळ्यासी भिडवुनी डोळा । कृपादृष्टी अवलोकिला ।
कोटणीसे बाळ अनुग्रहीला । वयाचे चौदावे दिनी ॥९॥

अनिलानलयोर्धाता अस्तंगत-मनो-मल: ।
अनेक-विघ्न-हर्ता हि अंत:करण-शासक: ।।११।।
गुरुलिंग-महाभक्तो गौर-वर्णो गुरोर्गुरु: ।
गुरुसिद्ध-प्रियालापी गुरु-भक्ति-परायण: ।।१२।।
भक्तिमद्-हनुमत्-शिष्यो भजनानंद-सेवन: ।
भक्त-पूजित-पादश्च भव-भीति-विनाशन: ।।१३।।
महाभागो महात्मा च मोक्ष-मार्गोपदेशक: ।
महाबोधिर्महाराजो महा-मानव-नायक: ।।१४।।
शुभद: शोभनाचार: शरणागत-रक्षक: ।
शरण्य: शौच-संपन्न: श्वासान्तर्नाम-बोधक: ।।१५।।
रामानंदस्य प्रह्लादो राम-दर्शन-प्रोत्सुक: ।
नागाप्पाण्णा-कृपा-पात्रं सिद्धानंदस्य सेवक: ।।१६।।
'ज्ञानदेव-तेहत्तिशी'-'सानंदा'-वृत्ति-कर्तृक: ।
ज्ञानी च ज्ञान-देवश्च ज्ञान-विज्ञान-देशिक: ।।१७।।
परमार्थी परं गन्ता पुष्कराक्ष: प्रियंवद: ।
गुरुलिंगस्य गीताया: श्रोता गुरु-प्रसादत: ।।१८।।
'अभंगानां' तथा कर्ता आत्मज्ञानी च आत्मवान् ।
अंतरात्मनि संलीन: अरिष्टानां निवारक: ।।१९।।
भक्तानुकंपन-ज्येष्ठो भव-बंध-विमोचक: ।
भव-रोगस्य वैद्यो वै भक्त-संतोष-कारक: ।।२०।।
शुभोपदेश-दाता च शरणागत-वत्सल: ।
शिव-नाम-श्रिया युक्त: शुद्धान्त:करण: शुचि: ।।२१।।

# - अनुक्रम -


■ दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना ---------------- एक
■ तिसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना ---------------- एक
■ मला ठाव द्यावा पायी ---------------------- दोन
■ लेखकाचे मनोगत ------------------------ तीन

◆ श्रीदासराममहाराजांचे नित्य-पाठ-चरित्र ------------१
◆ श्रीदासराममहाराजांचे कीर्तन-सार-अष्टक ---------१३
◆ श्रीदासराममहाराजांची आरती ------------------१४
◆ श्रीदासराम-नवार्णव मंत्र ---------------------१४
◆ श्रीदासराममहाराजांचा गायत्री मंत्र ----------------१४
◆ नमस्कार श्रीदासरामासी माझा ------------------१५
◆ श्रीदासराममहाराजांचा जयजयकार --------------१५
◆ श्रीदासराममहाराजांची प्रार्थना ------------------१६
◆ श्रीदासराममहाराजांचे पायीं दंडवत ---------------१६
◆ श्रीदासराममहाराजांच्या १०८ नामांचे स्तोत्र --------१७
◆ श्रीदासराममहाराजांची संस्कृतमधील आरती --------१९
◆ श्रीदासराममहाराजांचा निर्याणाचा अभंग ----------२०
◆ श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रम् ----------------------२१
◆ श्रीदासराम-महाराजस्य नमनाष्टकम्---------------२३

बोलिले कोटणीस तैं वेळा । “ नाम ‘ राम ’ योग्य बाळाला ।
हरिकीर्तन करण्याला । होईल तत्पर विष्णुभक्त हा ” ।।१० ।।

सार्थ कोटणीस-वचन झाले । वर्षी पाचव्या वयाचे भले ।
रामांनी कीर्तन पहिले केले । धन्य धन्य राम ते ।।११ ।।

सातवे वर्षी भली चांगली । रामा आत्मयाची स्फूर्ति झाली ।
अध्यात्म-काव्याची आवली । क्रमे प्रगट पै झाली ।।१२ ।।

नववे वर्षी वयाचे । तेरा सहस्त्र नाम-जपाचे ।
व्रत रामे धरले नित्याचे । धन्य तो महायोगी ।।१३ ।।

देवपूजा उत्तम साधणे । पालखी सोहाळा करणे ।
रंगोनी भजन गाणे । बालपणी छंद रामाचे ।।१४ ।।

पालखी छोटी वडिलांनी दिली । वीणाही लहान आणिली ।
रामाची पुरविली आळी । तीर्थरूप गोविंदांनी ।।१५ ।।

घराशेजारी नंबर दोन शाळा । घातले तेथे रामरायाला ।
प्रारंभ शिक्षणाचा झाला । लहानपणी ।।१६ ।।

बालरामाचे ऐकोनी कीर्तन । रामानंदमहाराज सुप्रसन्न ।
‘प्रल्हाद’ नावाची खूण । रामानंदे दिली असे ।।१७ ।।

बालपणीचे राम-कीर्तनी । प्रगट झाले सिद्धानंद मुनी ।
जे गुरुलिंगजंगमांचे जाणी । अवतारची खरे ।।१८ ।।

रामानंद एकदा बोलिले “प्रल्हाद । सांगशील काय संतवचन हृद्गद” ।
बोलती बालराम सानंद । “ वर्णीन गुरूचे कृपेनी ” ।।१९ ।।



चितेवरी कापूर चंदन । अमूप ओतिला जनानं ।
**अग्निनारायण झाला पावन** । रामांच्या स्पर्शे ।।१०० ।।

स्मशानी झाली भाषणे । वाहिली रामांना स्तुतिसुमने ।
दु:खी सकल निघाले परतोन । आपापल्या गृही ।।१०१ ।।

लगेच सुरू झाले श्रावण । शुद्ध सप्तमीपासून ।
चंद्रशेखरांचे नित्यकीर्तन । रामांचे आज्ञेनुसार ।।१०२ ।।

कीर्तनी राम साथ देती मामांना । तशीच दीपक चंद्रशेखरांना ।
साथ करीतसे कीर्तना । परंपरा ही अशी ।।१०३ ।।

पुढे झाले अस्थिसंचयन । केले रक्षेचे विसर्जन ।
त्यासाठी पवित्र तीर्थस्थान । निवडून घेतले ।।१०४ ।।

निर्वाणोत्तर दहावे दिवशी । झाला चमत्कार परियेसी ।
कावळा लौकर न स्पर्शी । पिंडालागी ।।१०५।।

मग गुरुसिद्दप्पा-पुत्र । येता सदाशिव तेथ ।
त्यांनी घातला दंडवत । पिंडासी शिवला कावळा ।।१०६ ।।

‘रामांची गुरुभक्ति मरणान्ती । सुद्धा दिसो आली निश्चिती’ ।
लोक असे बोलती । एकमेकांलागून ।।१०७ ।।

रामांच्या पादुका स्थापन । त्यांचे तैलचित्र महान ।
त्यांचे शिला-सिंहासन । झाले स्थापन घरामाजी ।।१०८ ।।

‘श्रीदासराममहाराज चरितामृत’ । ‘परमार्थप्रश्नोत्तरी’ हे ग्रंथ ।
झाले लगोलग प्रकाशित । दासराम गौरवासाठी ।।१०९ ।।

प्रकाशिका :
**सौ. माया के. आपटे**

© **नारायण केशव आपटे**
यजुर्वेद अपार्टमेंट, एस. टी. कॉलनी रोड,
विश्रामबाग, सांगली - ४१६ ४१५
दूरभाष : (०२३३) २३०१६९९

प्रथम आवृत्तीचा प्रकाशन दिनांक :
रविवार दि. ४/२/२००७
माघ वद्य ३ (गुरुतृतीया) शके १९२८

द्वितीय आवृत्तीचा प्रकाशन दिनांक :
रविवार दि. ९/११/२००८
कार्तिक शुक्ल ११ (प्रबोधिनी एकादशी) शके १९३०

तृतीय आवृत्तीचा प्रकाशन दिनांक :
बुधवार दि. ६/४/२०११
चैत्र शुक्ल ३ शके १९३३
(श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज पुण्यतिथि)

प्रसाद मूल्य : **पाच रुपये**

मुद्रक : **श्रीदासराम ऑफसेट,** सांगली.
फोन : ०२३३-२३२२७२९.



राजीव-लोचनो रामो राम-भक्ति-परायणः ।
रामानंद-प्रियो बालो राम-कीर्तन-कर्तृकः ।।२२।।
तत्त्वज्ञस्तत्त्ववादी वै तत्त्वात्मा तत्त्ववित्तमः ।
भावातीतो भवातीतो भाव-विघ्न-निवारकः ।।२३।।
कर्तानेक-प्रबंधानां कृत-संपूर्ण-साधनः ।
कृपासिंधुः कृतार्थश्च करुणाकर-सत्तमः ।।२४।।
वंदनीयो वरेण्यो वै वरदो वंद्य-वंदकः ।
स्वानंदस्थः सर्व-वंद्यः स्वरूपस्थः सुख-प्रदः ।।२५।।
इदं स्तोत्रं पठेत् प्राज्ञः परमार्थ-परायणः ।
दासरामो गुरुर्देवः संतुष्टः स्यान्न संशयः ।।२६।।

## श्रीदासराममहाराजांची संस्कृतमधील आरती

गुरुनाथो गुरुवर्यो हे गूढानंद ।
दासरामः सुविनीतो हे दत्तानंद ।
सांगली-कृत-वासो हे सिद्धानंद ।
निर्लेपस्त्वं मद-मुक्तो हे नित्यानंद ।।१।।

जय देव जय देव जय श्रीदासराम ।
आरात्रिकं कुर्वे तव श्रीदासराम ।। ध्रु. ।।

सुखकर्ता विमलात्मा विमल-स्वरूप ।
मुदितात्मा शुभकर्ता त्वं सत्ता-रूप ।
पादायातं दासं त्राहि मां राम ।
आर्तं तारय हीनं हे सीताराम ।।२।।

यावेळी दाखवण्या राम-संक्षिप्त-जीवन। 'श्रीदासराम गौरवगीत' प्रकाशन।
केले रामभक्त चंद्रशेखरानं । सकळ भक्तांसाठी ।।९०।।

झाल्यावरी सहस्रचंद्रदर्शन । श्रीदासरामांचे प्रकृतिमान ।
अधिकाधिक खालावले जाण । अशक्तपणा अति वाढला ।।९१।।

दोन हजार एक इसवी सन । आला साधन-मास श्रावण ।
ज्ञानदेव-हरिपाठावर कीर्तन । सुरू झाले रामांचे ।।९२।।

बुधवारी पंचमी-युक्त षष्ठी छान । उच्चारीत कीर्तन कीर्तन ।
दासरामांनी केले महाप्रयाण । सायं सात चाळीस ।।९३।।

सर्वत्र हाहाकार जाहला । अति शोक अनेकांना झाला ।
रामांचे अंतिम दर्शनाला । हजारो लोक पातले ।।९४।।

दुसरे दिवशी गुरुवारी । सकाळी नऊचे सुमारी ।
रामांची अखेरची यात्री । निघाली अति इतमामाने ।।९५।।

मार्गावरी जयजयकार भजन । मोठ्या आवाजी करती जन ।
पाणी घालीत काही जण । फुले हार अमाप उधळले ।।९६।।

अंत्ययात्रा 'कैवल्यधामी' आली । तेथे पूजा आरती झाली ।
सेनामहाराज मार्गे चालली । सकल यात्रा ।।९७।।

पुढे 'हनुमान समाधिमंदिरा'जवळ । आली अंत्ययात्रा सकळ ।
झाला आरतीचा कल्लोळ । समाधिमंदिरापुढे ।।९८।।

तेथोन 'अमरधामी' प्रयाण । झाले सकळांलागून ।
अंत्यविधी करवी ब्राह्मण । चंद्रशेखराकरवी ।।९९।।



घरी येवोनी बालरामे शुद्ध । रचिला ग्रंथ 'रामदासबोध' ।
ओवीबद्ध असे तो प्रबंध । वाचोनी हर्षले रामानंद ।।२०।।

नंतर अध्यात्म-साहित्य रामकृत । अभंग पदे आरतीसहित ।
संतग्रंथांवरी टिप्पणी-युक्त । बहुतची असे झाले ।।२१।।

एकदा बालरामे हट्ट केला । " श्रीरामदर्शन हवे मजला " ।
लळा वडिलांनी पुरविला । आवडीने बहुत ।।२२।।

होता शनिवारचा दिन । आले प्रथम वानर-सैन्य ।
आकाशी दिसले रामलक्ष्मण । नौकेमाजी बसलेले ।।२३।।

कोटणीस सद्गुरूवरी । निष्ठा रामाची असे भारी ।
पोवाडा स्तुतिपर करी । बक्षीसही मिळे तयाला ।।२४।।

शंकरमहाराज मिरीकर । म्हणती " राम हा योगीश्वर ।
मागील जन्माचा साचार । पुन्हा आला या लोकी " ।।२५।।

मराठी चौथी होता पूर्ण । घेण्या पुढील शिक्षण ।
सिटी हायस्कूलामाजी गमन । केले असे बालरामे ।।२६।।

एकदा पिताजींना राम म्हणाला । " कोटणीस गुरूंनी अनुग्रह केला ।
उमटविले मनी मम साधनाला । हे असे ज्ञात तुम्हा ।।२७।।

करतो मी त्याप्रमाणे साधन । परी ते आहे बरोबर हे जाणून ।
घेण्यास उत्सुक माझे मन । करा तुम्ही समाधान "।।२८।।

बोलले गोविंदराव रोकडे । " जाई बाबूरावजी कोटणीसांचेकडे ।
निवारतील तेच तुझे साकडे । नाही संदेह ये विषयी "।।२९।।

## श्रीदासराममहाराजांचा निर्याणाचा अभंग

शालिवाहन शके एकोणीसशे तेवीसात ।
वृष नाम संवत्सरात दक्षिणायन ।।१।।

श्रावण शुद्ध षष्ठी आणि बुधवार ।
रात्रौ प्रथम प्रहर दुसरे तासी ।।२।।

श्रीदासरामांनी केले हो निर्याण ।
मुखात वचन नित्य कीर्तनाचे ।।३।।

दासरामांलागी कीर्तनाचा ध्यास ।
परमार्थी प्रकाश पाडियेला ।।४।।

लेखन प्रवचन नित्याचे कीर्तन ।
यांमध्ये रममाण झाले साधु ।।५।।

जन्मतिथी षष्ठी निर्वाणतिथी षष्ठी ।
जन्ममरणाची गाठी पडियेली ।।६।।

आत्मारामी राम मिळोनिया गेले ।
स्मृतिरूपे उरले *केशव* मनी ।।७।।

*****

**श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प २८**

**श्रीदासराममहाराजांचे**

# नित्य-पाठ-चरित्र

**प्रा. डॉ. के. वा. आपटे**

✼ प्रकाशिका ✼

**सौ. माया के. आपटे**

आवृत्ती तिसरी — सांगली — इ. स. २०११

बाबूरावजींचेकडे जाऊन । विचारला दासरामांनी प्रश्न ।
"तुम्ही करता ते बरोबर साधन । संप्रदायाला धरून असे ।।३०।।

शंकेसी नाही कारण"। बाबूरावजींनी दिले आश्वासन ।
दासराम पावले समाधान । झाले मन निश्चिंत तयांचे ।।३१।।

राम एकदा साताऱ्याला गेले । स्वप्नी तुकाराममहाराज आले ।
उपदेश त्यांनी अभंगे केले । श्रीरामरायांना ।।३२।।

रामे प्रार्थिले स्व-संप्रदाय-सिद्धा । " मला द्यावे आपण बोधा " ।
तैं प्रगटली मनी बोधसुधा । ते हे ' सद्बोध-दशक ' ।।३३।।

होवोनी प्रगट निर्वाणोत्तर । मध्यरात्री माघमासी पवित्र ।
कोटणीसे आज्ञापिले कीर्तना गुरुवर । पिताजी रामाचे ।।३४।।

या प्रगटप्रसंगाची खूण म्हणून । गुरुतृतीया हा प्रगटदिन ।
प्रगटकाली हरिकीर्तन । केले सुरू दासरामे ।।३५।।

एकदा चिमड तीर्थक्षेत्राला । दासराम असे गेला ।
केले गुर्वाज्ञे कीर्तनाला । साधुमहाराज संमुख ।।३६।।

निंबरगीकरमहाराजांचे पौत्र । भीमाप्पाण्णामहाराजांचे सुपुत्र ।
नागाप्पाण्णामहाराज सुपात्र । असती कीर्तनी उपस्थित ।।३७।।

नागाप्पाण्णा बोलती रामाला । " प्रल्हाद, तू आहेसी भला ।
निंबरगीकरमहाराज देतील उपदेशाला । यथासमयी तुजप्रती "।।३८।।

ब्रह्मीभूत श्रीगुरुलिंगांनी । ' श्रीगुरुलिंगगीता ' परमार्थखाणी ।
नादरूपे दासराम श्रवणी । ऐकविली कृपा करोनी ।।३९।।



संप्रदाय-स्थानांचे घेण्या दर्शन । अनेक जनांसह करिती गमन ।
श्रीदासराम ते विनीत पूर्ण । भिन्न भिन्न स्थानी ।।८०।।

तीर्थ विटे रेवणसिद्ध । सिद्धगिरीवर काडसिद्ध ।
निंबरगी चिमड येथील सिद्ध । तथा आचरे रामेश्वर ।।८१।।

उपासनेत जात असता दिन । दासरामांची सत्तरी झाली पूर्ण ।
अमृतमहोत्सव केला आनंदानं । राम-पुत्र नि भक्तांनी ।।८२।।

ग्रंथ 'श्रीदासराम-गीत' । रचलेला संस्कृत भाषेत ।
या समयी झाला प्रकाशित । आले भरते आनंदा ।।८३।।

दासरामांचे नित्य हरिकीर्तन । यथाकाळी छत्तीस वर्षे पूर्ण ।
त्रि-तप-महोत्सव झाला संपन्न । हर्षले सकल जन ।।८४।।

सर्व महोत्सवप्रसंगी जाण । भजन भाषण प्रवचन कीर्तन ।
यांचा कडाका उडतसे छान । श्रोतयां मेजवानी ।।८५।।

पहा योगायोग काय आला । रामांचे पायात अस्थिभंग झाला ।
तथा नयनी मोतीबिंदू वाढला । शरीराचे भोग हे ।।८६।।

रामांना हॉस्पिटली नेले । त्यांना पडून रहावे लागले ।
तरी नित्यकीर्तन नाही सोडिले । अपूर्व ही कीर्तननिष्ठा ।।८७।।

रामांचा चंद्रशेखर ज्येष्ठ पुत्रक । त्याचा तनय नाम दीपक ।
दीपक-अनुराधा पतिपत्नीचे बालक । अतुल नामे प्रपौत्र रामांचा ।।८८।।

ऐंशीव्या वर्षात रामांचे पदार्पण । झाले त्यांना प्रपौत्र दर्शन ।
याग उत्सव सहस्रचंद्रदर्शन । पुत्रपौत्रादी मिळोन करती ।।८९।।

रुकडीकरमहाराजांचे पुण्यतिथीला । गेले दासराम कोल्हापूरला ।
स्वामी अमलानंदांचा लाभला । सहवास तेथे ।।७०।।

दासरामांचे जहाले कीर्तन । अभंग होता 'सोहं स्वरूप ते जाण'।
बदलले सकळ वातावरण । जाणवले श्रोतयांना ।।७१।।

स्वामी अमलानंद खूष झाले । आलिंगोनी हार गळा घातले ।
दासरामा स्वामीजी बोलिले । "नीट कळले आम्हां सोहं स्वरूप"।।७२।।

पुढे षष्ट्यब्दी रामांची आली । केला महोत्सव कुटुंबमंडळी ।
जमली भक्त मांदियाळी । भाव भक्ती उत्साहाने ।।७३।।

यासमयी एक सुबक ग्रंथ । 'श्रीदासराम गौरव' प्रकाशित ।
भक्तजन असे करीत । सोहळा झाला अपूर्व ।।७४।।

बरडे यांचे विठ्ठल मंदिरात । रामांचे काल्याचे कीर्तनात ।
पांडुरंग मूर्ति नाचली जोषात । राम-कीर्तन-रंगी ।।७५।।

काळ असा जात असता । निर्वाणा गेली सीता माता ।
दासरामांचे शिरावरता । ओढवला शोकभार ।।७६।।

परी प्रसंग तो तदा साहून । केले दासरामे कीर्तन ।
चकित झाले सारे जन । म्हणती ही खरी कीर्तननिष्ठा ।।७७।।

पुढे दासराम-कीर्तनालागी । पंचवीस वर्षे झाली वेगी ।
कुणी तयार न बसण्या उगी । रजतमहोत्सव झाला ।।७८।।

या आनंद प्रसंगात । केला असे प्रकाशित ग्रंथ ।
नाव 'श्रीदासराम वचनामृत' । अमृतत्व देतसे ।।७९।।



रामराय असता मॅट्रिकला । साथ घेवोनी पंडित मामाला ।
होते गेले रेणागिरिस्थानाला । रेवणसिद्ध दर्शना ।।४०।।

येता परतोनी सांगलीत । आले रेवणसिद्‌ध स्वप्नात ।
रामांचे कपाळी विभूत । लाविली जी रेवणसिद्‌धे ।।४१।।

दर्शनलाभाचा परिणाम झाला । रेवणसिद्‌धस्तुति अभंगमाला ।
'रेवणसिद्‌ध पाठ' तो स्फुरला । दासराम मनी ।।४२।।

बाबूरावजी कोटणीस वचनाने । संतांच्या कूट अभंगांचे लेणे ।
केले दासरामे टिप्पणीने । बरेचसे सुस्पष्ट ।।४३।।

असता रामराय मॅट्रिकला । योग विवाहाचा आला ।
मालती वधूशी संपन्न झाला । समसमा संयोग तो ।।४४।।

सासरी नाम तिचे सीता । पतिसेवा करण्या असे निरता ।
महासती खलु सुव्रता । कर्मयोगा आचरी ती ।।४५।।

परमार्था प्रपंच कुंपण । विचार ऐसा करोन ।
रामे पत्करले विवाह बंधन । परमार्थाचेसाठी ।।४६।।

चालून दैवयोगे आली । सांगली संस्थान ट्रेझरीत भली ।
तदा रामे स्वये पत्करली । सरकारी सेवा ।।४७।।

झाली पुढे तासगावी बदली । नोकरी दासरामे सोडली ।
गोविंदकीर्तना साथ करण्याची भली । आवडी अत्यंत असे की ।।४८।।

यथासमयी यथाकाळी । पुत्रां सीतामाता प्रसवली ।
चार पुत्रांची आई झाली । रामपत्नी शोभतसे ।।४९।।

चंद्रशेखर आणि सूर्यकांत । अनल अनिलप्रभु पश्चात ।
ऐसे हे चार सुत । रामराय-सीतेचे ।।५०।।

रोहिणी तथा अर्चना । सुनीता तैशी अपर्णा ।
अशा चौघी या सुना । श्रीदासराम-सीतेच्या ।।५१।।

निमंत्रणाने नाना क्षेत्री नाना गावी । मठी मंदिरी राम जाई ।
कीर्तनश्रवणाची तृष्णा शमवी । श्रोतयांची गुरुकृपे ।।५२।।

एकदा तुंग नामक गावाला । निघाले रामराय कीर्तनाला ।
वाटेमाजी त्यांच्या बैलगाडीला । झाला अपघात ।।५३।।

रामांना मुका मार लागला । परी सोडले नाही निश्चयाला ।
जावोनी त्या तुंग ग्रामाला । तैसेची कीर्तन केले ।।५४।।

नारदमंदिरी पुणे नगरात । आमंत्रण कीर्तन करण्या येत ।
तेथ राम कीर्तन करीत । आवडले बहुत श्रोतयांना ।।५५।।

सांगली संस्थानी काळात । राजवाडा दिवाणखान्यात ।
गणेशचतुर्थी उत्सवात । झाले कीर्तन रामांचे ।।५६।।

खाजगी कारभारी भले । बिदागी देऊ लागले ।
रामरायांनी ते नाकारले । चकित झाले कारभारी ।।५७।।

गेले राम एकदा देहूस । त्यांनी तेथे केले कीर्तनास ।
देहूकरमहाराज खूष । त्यांनी कौतुक अपार केले ।।५८।।

एकदा राम होते पालघरात । तेथे गुरुलिंगजंगम प्रगट होत ।
सांगलीस परतण्याची आज्ञा करीत । श्रीरामरायांना ।।५९।।



राम-पिता गोविंद दैनंदिन । करी हरीचे अखंड कीर्तन ।
कीर्तनाची पंचविशी पूर्ण । पुढे छत्तीशीही झाली असे ।।६०।।

यानिमित्त दासरामाने । केले महोत्सव हर्षाने ।
तसेच महोत्साहाने । पितृ-गौरव करण्याला ।।६१।।

काळ जातो कैसा कोणा न कळे । गोविंद-इंदिरांचे निर्वाण झाले ।
वृद्धापकाळी घडून आले । झाले दोघे ब्रह्मरूप ।।६२।।

दुःखाचा कडा डोंगर । असे कोसळला रामांवर ।
परी मनी धरोनी धीर । नित्यकीर्तन राम चालवी ।।६३।।

मधुमेह रक्तदाब शिरले शरीरात । कधी ताप येई खूप अंगात ।
तरी राम कीर्तन करीत । न देता ढळू निष्ठा ।।६४।।

गोविंदरावांचे कीर्तनस्थळी । रामे सिंहासन-शिला स्थापिली ।
काळ्या पाषाणाची असे भली । दिसे शोभून देवापुढे ।।६५।।

इच्छा राम-पित्याची होती । नित्य हरिकीर्तनाची स्थिती ।
दासरामे चालवावी निश्चिती । निर्धार धरोनी ।।६६।।

इच्छा ती पुरी रामांनी केली । कीर्तननिष्ठा त्यांची भली ।
आमरण कीर्तन चाली । चालविली रामांनी ।।६७।।

'अप्पाची वाडी' नामक गावी । हालसिद्धरूप धरोनी रेणाई ।
सुख देण्या सावित्री माई । वसतसे संजीवन समाधी ।।६८।।

कुटुंबासहित दासराम । गेले घेण्या दर्शन श्रेष्ठ परम ।
हालसिद्ध प्रगटले आराम । सुगंध अपूर्व दरवळला ।।६९।।

## श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रम्

अस्य श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रस्य *केशवः* कविः । श्रीदासरामो देवता ।
अनुष्टुप् छंदः । श्रीसीता शक्तिः । श्रीदासराम-प्रीत्यर्थे जपे विनियोगः ।

।। अथ ध्यानम् ।।

गौरांगं मनसा ध्यायेद् दासरामं दयाकरम् ।
सीता-पतिं च श्रीरामं स्वरूपस्थं सुखप्रदम् ।।

।। इति ध्यानम् ।।

गुरुलिंग-प्रियं ध्यात्वा देव-सेवा-परायणम् ।
रक्षा-स्तोत्रं पठेद् भक्त इच्छन् सकल-रक्षणम् ।।१।।
महात्मा मस्तकं पातु भालं भक्तार्थ-पूरकः ।
इंदिरा-तनयो नेत्रे कर्णौ कैवल्य-कारकः ।।२।।
घ्राणं पातु गुणागारो मुखं गोविंद-पुत्रकः ।
दयालू रक्षतु दंतान् ओष्ठौ कीर्तन-कर्तृकः ।।३।।
जिह्वां बोध-निधिः पातु पुष्कराक्षः प्रियंवदः ।
वाणीं पातु प्रियालापी परमार्थ-प्रभाकरः ।।४।।
हनुं हर्ष-समायुक्तः प्रसन्न-वदनस्तथा ।
कंठं पातु कृतार्थश्च स्कंधौ पातु सदा शिवः ।।५।।
भुजौ पातु महाभक्तः करौ निर्वाण-दायकः ।
हृदयं पातु ह्री-युक्तो मध्यं माया-प्रभंजनः ।।६।।



उदरं पातु ऊर्जस्वी परमात्मा परात्परः ।
नाभिं पातु महानादः कटी कारुण्य-संयुतः ।।७।।
ऊरू साधूत्तमः पातु सक्थिनी सुर-संस्तुतः ।
जानुनी जपकृत् पातु जंघे काम-निवारकः ।।८।।
गुह्ये पातु सुधीः श्रेष्ठः परेशः पातु मे पदे ।
प्राणान् पातु परात्मा च शरीरं पातु शक्तिमान् ।।९।।
आंतरं करणं पातु हनुमद्-गुरु-सेवकः ।
अंतर्बहिश्च मां नित्यं पातु संपूर्ण-साधनः ।।१०।।
देह-दुःख-भयार्तिभ्यः सिद्धानंद-प्रियः सदा ।
उपरिष्टादधस्ताच्च पातु वै पुत्र-पूजितः ।।११।।
पुरतः पृष्ठतश्चैव तथा देहस्य पार्श्वकौ ।
महाभाग्यः सदा पातु भव-भीति-विनाशनः ।।१२।।
कुप्रसंगाच्च दुःस्वप्नात् रक्षतु करुणार्णवः ।
अनारोग्यात् तथा चैव पातु वै परमेश्वरः ।।१३।।
सर्वस्वं दासरामो मे सर्वेशः सत्त्ववान् किल ।
दासरामं विना चान्यं नैव जानामि नैव च ।।१४।।
गुरवे दासरामाय सच्चिदानंद-रूपिणे ।
महा-मानव-नाथाय वारं वारं नमो नमः ।।१५।।

।। इति श्रीदासराम-रक्षा-स्तोत्रं संपूर्णम् ।।

❖ श्रीदासराम ग्रंथमाला पुष्प यादी ❖

| पुस्तकाचे नांव | पुष्प क्रमांक | सन |
|---|---|---|
| चिमड संप्रदाय | १ | २००५ |
| श्रीरामदासस्वामी चरित्र | २ | २००६ |
| भजन तरंग | ३ | २००६ |
| हरिपाठ संकीर्तन | ४ | २००७ |
| श्रीदासराममहाराज नित्यपाठ चरित्र | ५ | २००७ |
| दासबोधातील तत्त्वज्ञान | ६ | २००७ |
| श्रीदासराममहाराजांचा वचनसंग्रह | ७ | २००८ |
| श्रीरघुनाथप्रिय साधुमहाराज चरित्र | ८ | २००९ |
| साधन संध्या | ९ | २००९ |
| अनंत अमृत स्मरण | १० | २००९ |
| श्रीगुरु महिमा | ११ | २००९ |
| श्रीज्ञानेश्वरी प्रसाद | १२ | २००९ |
| श्रीदासराम गाथा : पुरवणी | १३ | २००९ |
| श्रीदासराममहाराज आत्मचरित्र | १४ | २०१० |
| श्रीनारायणमहाराज यरगट्टीकर यांचे चरित्र | १५ | २०१० |
| श्रीदासराममहाराज : श्लोकरचना ज्ञानदेवकृत | १६ | २०१० |
| अनुभवामृत ओवी टीकेसहीत | १७ | २०१० |
| श्रीदासराममहाराज सहस्रनामस्तोत्रम् | १८ | २०१० |
| आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत्त गद्य अर्थासह) | १९ | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (कानडी लिपीत) | २० | २०१० |
| श्रीगुरुलिंगगीता (मराठी लिपीत) | २१ | २०१० |
| श्रीरामनिकेतन (परिचय पत्रिका) | २२ | २०११ |
| श्रीरामनिकेतनमधील आराधना | २३ | २०११ |
| ग्रंथत्रयी | २४ | २०११ |
| उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत्त गद्य अर्थासह) | २५ | २०११ |
| अभंग दरबार | २६ | २०११ |
| सद्बोध दशक | २७ | २०११ |



# श्रीदासराम-महाराजस्य नमनाष्टकम्

गोविंदस्य सुतं श्रेष्ठं हनुमत्-पाद-सेवकम् ।
इंदिरानंद-दातारं रामं वन्दे परं गुरुम् ।। १।।
दासरामं महाराजं साधकामोद-वर्धनम् ।
पूतं च पूजनीयं च प्रणमामि परात्परम् ।।२।।
कीर्तयेय च रामस्य विशुद्धं नाम सर्वदा ।
पूजयेय च रामस्य पादौ परमपावनौ ।।३।।
वन्दे रामं महाभक्तं दासं रामस्य संयतम् ।
बंधमुक्तं भवातीतं भक्त-रक्षण-तत्परम् ।।४।।
शृणोमि श्रवणीयं च दासरामस्य नामकम् ।
वदामि दासरामस्य पवित्रं नाम संस्तुतम् ।। ५।।
करोमि दासरामस्य नित्यं चरण-चिंतनम् ।
स्मरामि दासरामस्य संततं नाम मंगलम् ।।६।।
गुरवे दासरामाय महेशाय महात्मने ।
साधवे साधु-बोधाय नमो नित्यं नमो नम: ।।७।।
इंदिरा-गोविंद-सुतं शिष्यं हनुमतो वरम् ।
*केशवो* वन्दते नित्यं दासरामं कृपाकरम् ।। ८।।

*****

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

१) मनोहर विनायक मंगळवेढेकर यांचे ओवीबद्ध चरित्र................१९४०

२) श्रीज्ञानदेवतेहत्तिशी,सानंद टीकेसह,व तात्पर्यार्थसह श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा हरिपाठ...१९५२

३) श्रीज्ञानदेवमुद्राप्रकाश साधनमुद्रा टीकेसह, आणि ज्ञानेश्वरीसार........१९६८

४) वायुलहरी, आणि ज्ञानदेव आज्ञापत्र (ओवीबद्ध भावार्थ)............१९६९

५) ज्ञानेश्वरकृत दत्तस्तुति, श्रीदत्तस्तुतिप्रसाद ओवीबद्ध टीकेसह.........१९७१

६) श्रीज्ञानेश्वरकृत नमनस्तोत्र, भावार्थ नमनासह.........................१९७२

७) श्रीनारायणरावजीमहाराज यरगट्टीकर चरितामृत........................१९७३

८) श्रीनागाप्पाण्णामहाराज निंबरगीकर चरित्र.................(सन दिलेला नाही)

९) श्रीज्ञानेश्वरी चिंतनस्तोत्र व ज्ञानेश्वरी संकीर्तन स्तोत्र (भावार्थासह)....१९७४

१०) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र....................................................१९७५

११) सिद्धस्तुती..........................................................१९७७

१२) अमृतानुभव - मंगलाचरण, मंगलप्रसाद टीकेसह.....................१९७९

१३) तात्यासाहेब कोटणीसमहाराज चरित्र................................१९८३

१४) श्रीसंत राधाबाई अक्का यांचे चरित्र..............................(सन नाही)

१५) गुरुपाठ.............................................................१९८४

१६) सांप्रदायबोध...................................................... १९८४

१७) श्रीरामपाठामृत.....................................................१९८४

१८) बाबासाहेब मुजुमदार यांचे चरित्र...................................१९८४

१९) श्रीएकनाथी भागवत : संक्षिप्त पाठस्तोत्र.............................१९८७

२०) नित्यपाठामृत.......................................................१९८७

२१) संजीवनपाठ.......................................................१९८७

## श्रीदासराममहाराजांची ग्रंथसंपदा

२२) श्रीदासरामवचनामृत...............................................१९८७

२३) नासदीयसूक्त, भावार्थ संगति......................................१९८८

२४) श्रीगोविंददर्शन...................................................१९८८

२५) सांगली माहात्म्य ऊर्फ श्रीगंगाधरपंत चरितामृत.....................१९८८

२६) श्रीदासरामगाथा..................................................१९८८

२७) श्रीतुकाराममहाराज नित्यपाठ, भावार्थ विवरण......................१९८९

२८) श्रीगुरुमहिमा......................................................१९९१

२९) श्रीज्ञानेश्वरस्तोत्र व अन्य लघुग्रंथ..................................१९९७

३०) श्रीरामदासबोध...................................................१९९७

३१) श्रीचांगदेवपासष्टी, एक नाम कला.................................१९९९

३२) परमार्थासार आणि अन्य ग्रंथ (उद्धवरावजी महाराज यरगट्टीकरांच्या चरित्रासह)....२००२

३३) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती पाहिली व दुसरी........................२००२

३४) आरती संग्रह......................................................२००२

३५) चांगदेव पासष्टी व इतर ग्रंथ.......................................२००२

३६) हरिपाठ संकीर्तन..................................................२००७

३७) श्रीदासराममहाराज : श्लोकरचना..................................२०१०

३८) अनुभवामृत सम-ओवी-टीकेसह...................................२०१०

३९) परमार्थ प्रश्नोत्तरी, आवृत्ती तिसरी.................................२०१०

४०) आत्माराम (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)....................२०१०

४१) ग्रंथत्रयी..........................................................२०११

४२) उत्तरगीता (श्रीदासराममहाराजकृत गद्य अर्थासह)....................२०११